


# भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

१८५७ - १९०५

प्रा. एन. व्ही. भारंबे

प्रकरण - १

# भारतातील ब्रिटिश सत्ता

१.१ भारतात ब्रिटिश सत्तेच्या उदय आणि विकास
१.२ भारतात ब्रिटिश धोरण- भारतावरील सामाजिक, आर्थिक जीवनावरील प्रभाव
१.३ भारतातील प्रबोधन - राजा राममोहन रॉय.

**बंगाल मध्ये इंग्रज सत्तेच्या उदय -**

इंग्रजांनी बंगाल मध्ये व्यापारी केंद्र १६५१ मध्ये हुगळी येथे स्थापन केले. तत्कालिन मुघल सुभेदार शाहशुजा (मोगल बादशहा-शहाजहानचा मुलगा) याने इंग्रजांना व्यापारासाठी परवानगी दिली. त्यानुसार कासीम बाजार, पटना गोविंदपूर येथे व्यापारी केंद्र स्थापन केले.

**बंगालमधील मोगल सत्ता -** बंगाल, बिहार ओरिसा हा संपूर्ण प्रदेश बंगाल प्रांत समजला जात होता. १७४० मध्ये बंगाल प्रांताचा सुभेदार, सर्फराजखाँ या विरूध्द बंड करून बिहारचा नायब सुभेदार अलिवर्दीखाँ बंगालचा नबाब बनला. त्यांनर त्याचा नातु सिराज उद्दौला बंगालचा नबाब बनतो. १७५६ मध्ये सिराज उद्दौलांने इंग्रजा विरूध्द मोहीम सुरू केली तेव्हा इंग्रजांनी शरणागती पत्करली.

**अंधार कोठडी घटना -** कलकत्ता नबाबाच्या ताब्यात आले तेव्हा काही इंग्रज कैद्यांना अंधार कोठडीत कैद केले. दुसऱ्या दिवशी त्यातील १२३ कैदी मरण पावले. इंग्रजांनी या घटनेचे फार मोठे भांडवल केले व नबाब विरूध्द वातावरण तयार झाले.

**प्लासीचे युध्द (१७५७) -** लार्ड क्लाईव्ह व अॅडमिरल वॅटसन हे मद्रासहून सैन्य घेवून आले व कलकत्याला पोहचले व कलकता ताब्यात घेतले. सिराज उद्दौला ने इंग्रजांशी १ फेब्रुवारी १७५७ रोजी शांततेचा तह केला व सिराज उद्दौला नंतर नबाब पद देण्याचे आश्वासन दिले व प्लासीचे युध्द घडवून आणले.

मार्च १७५७ ला इंग्रजांनी फ्रेंच वसाहत जिंकून घेतली. त्यामुळे नबाब संतापला. परिणाम इंग्रज व नबाब यांच्यात २३ जून १७५७ रोजी मुर्शिदाबाद जवळ प्लासी गावात युद्ध झाले. यात नबाबाचा पराभव झाला व मीर जाफरला नबाब घोषित केले. सिराज

## राजा राममोहन रॉय (१७७२ ते १८३३) -




- २२ मे १७७२ रोजी बंगालमधील राधानगर (हुगळी) येथे जन्म झाला.
- वाराणसीला संस्कृत व हिंदी तत्त्वज्ञान अभ्यास केला.
- फारसी, अरबी वाङ्मय अध्ययन केले.
- इंग्रजी, लॅटिन, हिब्र, ग्रीक, अरबी भाषेचे ज्ञान होते.
- १८१९ आत्मीय सभा स्थापन केली.
- १८१७ कलकत्त्यास हिंदू कॉलेज स्थापन केले.
- १८२१ 'संवाद कौमुदी' वृत्तपत्र सुरू केले.
- ४ डिसेंबर १८२९ ला सतीची चाल बंद कायदा मंजूर करण्यात पुढाकार घेतला व विल्यंम बेंटिगने हा कायदा केला.
- मिरत-उल-अखबार फार्सी भाषेत वृत्तपत्र सुरू केले.
- वेदांत महाविद्यालय स्थापना.
- ब्राह्मो समाज स्थापना (१८२८). ब्राह्मो समाज मंदिर (१८३०) बांधले.
- १८३० ला नोव्हेंबर महिन्यात इंग्लंडला प्रवास केला.
- १८३२ ला पॅरिसला भेट व फ्रान्सच्या राजांची भेट घेतली.
- १८३३ ला निधन झाले.

रॉय यांचा जन्म २२ मे १७७२ ला बंगाल प्रांतातील हुगळी येथील राधानगर या गावात झाला. त्यांचे शिक्षण गुरूकुलात झाले. त्यांनी फार्सी, अरबी, इंग्रजी, हिब्रु, ग्रीक, लॅटिन या भाषा अवगत केल्या होत्या. हिंदू धर्मातील अंधश्रध्दा, मूर्तिपूजा, एकेश्वर वाद याची जाणीव झाली व त्या विषयी चिड निर्माण झाली. त्या संदर्भात एक निबंध लिहिला पण त्याविरूध्द टीका झाली.

सनातनी हिंदुत्त्वाला दोषमुक्त करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. ते ईस्ट इंडिया कंपनीत महसूल अधिकऱ्यांचे सहाय्यक म्हणून नोकरी करू लागले. नंतर नोकरी सोडली व ते समाजप्रबोधन कार्यात सामील झाले. त्याचे कार्य पुढीलप्रमाणे -

१) आत्मीय सभा- रॉय यांनी १८१५ मध्ये आत्मीय सभा नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत मुलींची विक्री प्रथा व जाती संस्था विरोधी चळवळ सुरू केली. या संस्थेतर्फे स्त्रीयांना पितृत्त्वाच्या व पतीच्या संपत्तीत हक्क

## १) महात्मा ज्योतिबा फुले -



- ⇨ जन्म १८२७ मध्ये पुण्यात झाला.
- ⇨ वयाच्या १३ व्या वर्षी विवाह झाला.
- ⇨ १८४१ मध्ये स्कॉटिश मिशनरी शाळेत शिक्षण घेतले.
- ⇨ १८४८ मध्ये मुलींसाठी शाळा स्थापन केली.
- ⇨ १८५२ अस्पश्य मुलांसाठी शाळा सुरू केली.
- ⇨ १८६३ बालहत्या प्रतिबंध गृह स्थापन केले.
- ⇨ स्त्री उद्धाराचे कार्य, स्त्री शिक्षण.
- ⇨ १८५१ दुसरी मुलींची शाळा बुधवार पेठेत, मुलींची तिसरी शाळा रास्तापेठेत.
- ⇨ १८५२ वेताळ पेठेत चौथी मुलींची शाळा सुरू केली.
- ⇨ विधवांच्या पुनर्विवाहास प्रोत्साहन दिले. १८६४ मध्ये गोखल्यांच्या बागेत एक विधवा विवाह घडवून आणला.
- ⇨ अनाथाश्रमातून एका मुलास दत्तक घेऊन त्याचे शिक्षण पूर्ण केले.
- ⇨ समता चळवळ व पुण्यात तीन अस्पृश्याकरिता शाळा काढल्या.
- ⇨ गुलामगिरी हा ग्रंथ (१८७३), शेतकऱ्यांचा आसूड (१८८३), 'तृतीयरत्न नाटक', 'शिवाजी महाराजांचा पोवाडा', 'ब्राह्मणांचे कसब' हे पद्यात्मक पुस्तके. 'इशारा' सार्वजनिक सत्यधर्म हे पुस्तक लिखाण केले.

## ३) पंडिता रमाबाई (१८५८-१९२२) -



⇨ जन्म मंगरूळ माळहेरंजी येथे झाला.

⇨ आर्य महिला समाजाची स्थापना पुणे येथे केली. नंतर अहमदनगर, ठाणे, सोलापूर, मुंबई, पंढरपूर, बार्शी येथे.

⇨ बालविवाह, पुनर्विवाह बंदी, शिक्षण बंदी या चालिरिती विरूद्ध स्त्री मुक्तीची चळवळ सुरू केली.

⇨ स्त्री धर्मनीति हे पुस्तक लिहिले.

⇨ १८८३ मध्ये हंटर आयोगासमोर स्त्री शिक्षणा संदर्भात विचार मांडले.

⇨ इंग्लंड-अमेरिका प्रवास, ख्रिश्चन धर्म स्विकारला. (१८८३)

⇨ बाल विधवांवर 'द हायकास्ट हिंदू वुमन' हे इंग्रजी पुस्तक लिहिले.

⇨ अमेरिकेत रमाबाई असोसिएशन संस्था स्थापन केली.

⇨ ११ मार्च १८८९ ला मुंबई येथे बालविधवांसाठी 'शारदा सदन' ची स्थापना केली. अनाथ स्त्रीयांसाठी राहणे व जेवण सुविधा केली.

⇨ १८९० ला शारदा सदन पुण्यात हलविले.

⇨ १८९८ ला केडगाव पुणे येथे मुक्ति सदन स्थापन केले. अनाथ स्त्रियांसाठी राहणे व जेवणाची सुविधा केली. शेती, विणकाम, मुद्रणकाम शिक्षणाची सोय

## ४) स्वामी विवेकानंद -



- जन्म नाव नरेंद्र दत्त होते.
- जन्म : १२ जानेवारी १८६३
- शिक्षण : बी. ए. पदवी.
- तपश्चर्या :

  १८८४ - हिमालयात प्रमाण

  १८८० - एक समारंभात रामकृष्ण परमहंस यांची भेट

  १८८८ - भारत भ्रमणास सुरुवात केली.

  १८८८-९० - उत्तर भारत भ्रमण.

  १८९०-९१ - हिमालयात भ्रमंती.

  १८९१ - राजपुताना भ्रमंती

  १८९१-९२ - पश्चिम भारत

  १८९२-९३ - दक्षिण भारत
- अमेरिका प्रथम भेट : १८९३-९७
- व्याख्याने इंग्लड : अमेरिका
- भारतात परत १५ जानेवारी : १८९७
- भारतात रामकृष्ण मिशनची स्थापना : १ मे १८९७
- अमेरिका दुसऱ्यांद भेट : १८९९-१९०२
- मृत्यू : ४ जुलै १९०२

# १८५७ चा उठाव

२.१ कारणे
२.२ परिणाम

**१८५७ चा उठाव –**

ईस्ट इंडिया कंपनी इ.स. १६०० मध्ये व्यापार करण्यासाठी भारतात आले व १७५७ च्या प्लासीच्या युध्दाने बंगाल प्रांतावर वर्चस्व स्थापन केले व हळूहळू संबध भारतात राजकीय सत्ता निर्माण केली. १७५७ ते १८५७ या शंभर वर्षात ब्रिटीशांनी अनेक जमीन महसूला संबधी कायदे केले. जमीनदार व सरंजामदार, संस्थानिके यांची वतने, संस्थानिके खालसा झाल्याने सर्व भारतीयांच्या मनात ब्रिटीशांविरूध्द असंतोष निर्माण झाला. ब्रिटीशांविरूध्द छोटे उठाव, बंड होत होते. शेतकरी नाराज झाले. अशा अनेक कारणांनी ब्रिटीशांबद्दल भारतीयांच्या मनात असंतोष पसरला. त्याचा परिणाम १८५७ उठाव झाला. त्यानंतर ब्रिटीश सत्तेचे स्वरूप बदलले. भारतीय सत्ता ब्रिटीश संसदेकडे आली.

**उठावाची कारणे –**

१) **राजकीय कारणे :**

अ) **डलहौसीचे राज्ये खालसा धोरण –** लार्ड डलहौसीने साम्राज्यवादी धोरण अवलंबून, अनेक कारणांनी हिंदुस्थानातील संस्थानिके खालसा केली व ब्रिटीश साम्राज्याखाली जोडली. अवध संस्थानात अराजकता उदभवली म्हणून ते खालसा केले. १८४९ ला शिखांचा पराभव केला व पंजाब इंग्रज साम्राज्याला जोडले. १८५२ ब्रम्हदेश युध्दात पराभव केला व १८५६ सिक्किम, दार्जिलिंग ब्रिटीश साम्राज्यास जोडले.

ब) **दत्तक वारस नामंजूर –** राज्याला संतान नसेल तर दत्तक घेण्याची प्रथा होती. पण डलहौसीने दत्तकपूत्र नामंजूर केले व ती राज्ये खालसा केली. ब्रिटीश साम्राज्यास जोडली.

उदा. सातारा–१८४८ जैतपूर, संबळपूर–१८५०, उदयपूर–१८५२, नागपूर–

१८५३, झाशी-१८५४.

क) **तैनाती फौज पध्दती** - लॉर्ड डलहौसीने तयार केलेली तैनाती फौज पद्धती ज्या राज्यांनी स्विकारली व फौजेचे पैसे बाकी आहे ते वसूल करण्याचे कारण दाखवून ती संस्थाने ब्रिटीश साम्राज्याला जोडली.

उदा. वऱ्हाड प्रांत, अवध संस्थान, मराठ्यांचे शिंदे, होळकर, भोसले ही संस्थाने खालसा केली.

ड) **पदव्या, तनखे बंद** - राजे रजवाड्यांना पदव्या व तनखे इंग्रज सरकार देत असे. या ना त्या कारणाने लॉर्ड डलहौसीने ते बंद केले. पदव्या काढून घेतल्या, त्यात नानासाहेब पेशवे होते. मुघल बादशाहाचे वर्षासन बंद केले. परिणाम सर्व संस्थानिके राजे ब्रिटीशांच्या विरूध्द गेले.

च) **पेंढारी ठग** - ब्रिटीशांनी पेंढारी, ठग हे लुटारू होते. त्यांचा बंदोबस्त केल्याने. ते ब्रिटीशांविरूध्द गेले.

२) **वंश श्रेष्ठवाद** - ब्रिटीश प्रशासनातील अधिकारी स्वताला हिंदी अधिकाऱ्यांपेक्षा श्रेष्ठ समजत असत. ते हिंदी लोकांचा अपमान करीत, हेटाळणी करीत असत. हिंदी प्रशासनात भरती करावे असे १८३३ च्या चार्टर ॲक्ट प्रमाणे ठरले तरी त्यांची अमंलबजावणी केली नाही. प्रशासकीय भेदामुळे भारतीयांच्या मनात ब्रिटिशांबद्दल असंतोष वाढत गेला.

अ) **ब्रिटीश पक्षपाती न्याय व्यवस्था** - न्यायालय ब्रिटीश व हिंदी नागरीक असा पक्षपातीपणा करून न्याय देत असे.

क) ब्रिटीश अधिकाऱ्यांना समान पदासाठी जास्त वेतन दिले व हिंदी अधिकाऱ्यांना कमी वेतन त्यामुळे भारतीय अधिकाऱ्यांमध्ये असंतोष वाढत गेला.

३) सामाजिक कारणे -

अ) इंग्रजी शिक्षण व्यवस्था- ब्रिटीशांनी भारतात पाश्चात्य शिक्षण देणे सुरू केले. ते हिंदी समाजाला रूचले नाही. शाळेत आति भेद धर्म भेद पालत सर्व एकत्र शिक्षण दिले जात असे. भारतीय लोकांच्या मनात इंग्रजी शिक्षणामुळे आपली संस्कृती बुडेल, अशी तीव्र भावना झाली. त्याचा परिणाम इंग्रजी सत्तेबद्दल लोकांच्या मनात असंतोष वाढत गेला.

ब) **विधवा पुनर्विवाह कायदा (१८५६)** - हा कायदा परंपरागत रूढी प्रथा विरूध्द आहे. त्यामुळे लोकांमध्ये असंतोषाची भावना वाढण्यास सुरुवात झाली.

प्रकरण ४ थे

# भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

४.१ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्थापना:
४.२ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कार्ये १८८५-१९०५
४.३ बंगाल फाळणी

भारतात ब्रिटीशांची सत्ता निर्माण झाली. ते राज्यकर्ते बनले. त्यांनी भारतात अन्याय जुलूम करावयास प्रारंभ केला. भारतीय जमीनदानांच्या जमीनी सरकार जमा केल्या. संस्थानिके बरखास्त केली व ब्रिटीश साम्राज्यास जोडली. इंग्रज अधिकारी भारतीयांशी व्यवहार करतांना वंश भेद ठेवत. भारतात इंग्रजी शिक्षणामुळे सुजाण झालेले एक सुशिक्षित वर्ग निर्माण झाला. याच वर्गाने समाजाचे नेतृत्व केले व स्वातंत्र्य चळवळ उभारली त्याचा परिणाम एक पाऊल पुढे पडले. ते १८५१ चे बंड पुकारले. पण ते मर्यादित स्वरुपाचे होते.

**१८८५ ला राष्ट्रीय सभा स्थापन केली. त्याची कारणे -**

१) **धार्मिक सुधारणा चळवळी -** भारतात हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, कर्मकांड, मुर्तिपुजा याविरुध्द विचार मांडले. खरा धर्म वेदांत आहे. याकरिता प्रयत्न सुरु झाले. ब्राम्हो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन, थिऑसॉफिकल सोसायटी अशा अनेक संस्था निर्माण झाल्या. त्यांनी हिंदु धर्माचे खरे स्वरुप लोकांसमोर आणले. या संस्थांनी धार्मिक सुधारणाबरोबर सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. सामाजातील वाईट प्रथा, सतीची चाल, विधवा पद्धती, स्त्री शिक्षण नसणे, सामान्य जनतेला शिक्षण नसणे व अस्पृश्यता या विरुध्द जनजागृती घडवून आणली व हिंदू सामाजाची अस्मितता निर्माण केली. त्याचा परिणाम राजकिय जाणीव जागृती घडून आली व आधुनिक विचार व कार्यकर्ते निर्माण झाले. सामाजाचे नव प्रबोधन सुरू झाले. याच प्रयत्नातून भारतात राष्ट्रवाद उदयास आला.

२) **सामाजिक सुधारणा -** पाश्चात्य शिक्षणामुळे भारतात नव वर्ग उदयास आला. भारतीयांना पाश्चात्य संस्कृतीचे ज्ञान झाले. स्वातंत्र्य, समता, बंधुता लोकशाही, हक्क, अधिकार, प्लेटो ॲरिस्टॉटल यांचे विचार व सिद्धांत अभ्यासले. नव मुल्ये निर्माण झाली. परिणाम या तरुण सुशिक्षित वर्गात समाजातील वाईट रुढी

परंपरा चालीरिती ह्याची जाणीव झाली व त्या दूर झाल्याशिवाय समाज सुधारणार नाही ही जांणीव निर्माण झाली. भारतीय समाजातील कुप्रथा नष्ट करण्यासाठी चळवळी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या.

अ) **राजा राममोहन रॉय** – सतीची चाल बंदी कायदा करण्यास भाग पाडले व स्त्री शिक्षण व इतरांना शिक्षण देण्यासाठी शिक्षण संस्था स्थापन केल्या.

ब) **महात्मा फुले** – स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. अस्पृश्यता निवारणाचे कार्य सुरु झाले. अस्पृश्यांकरिता, स्त्रीयांकरिता पहिली शाळा सुरु केली. शेतकऱ्यांची समस्या सरकारसमोर मांडल्या व कामगारांचे संघटन केले.

क) **परमहंस सभा** – दादोबा तर्खडकर यांनी स्थापन केली. जाती व्यवस्था नष्ट करणे, मुर्तीपूजा करु नये, विधवा पुनर्विवाह घडवून आणणे. दलितांना शिक्षण.

ड) **लोकहितवादी** – गोपाळ हरी देशमुख यांनी समाज प्रबोधन घडवून आणण्यासाठी वृत्तपत्रातून लिखाण केले त्यातूनच समाज जागृती घडवून आणली.

इ) **बाळशास्त्री जांभेकर** – स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह या विषयावर लिखाण केले.

फ) **विठ्ठल रामजी शिंदे** – शिक्षण प्रसार, अस्पृश्यता निवारण, दीन दुबळ्यांची सेवा व पुण्यात अहिंसा आश्रमाची स्थापना केली.

च) **कर्मवीर भाऊराव पाटील** – यांनी ठिकठिकाणी वसतीगृहे स्थापन केले. रयत शिक्षण संस्था, हायस्कूल, कॉलेजेस काढले. त्यात १६ प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, २९ कॉलेज, १९ वसतीगृहे, ८ अध्यापक विद्यालये स्थापन केले.

छ) **महर्षी कर्वे** – स्त्री शिक्षण संस्था, एस.एन.डी.टी. विद्यापीठ स्थापना केली.

३) **पाश्चात्य शिक्षण** – भारतात राष्ट्रवाद निर्माण करण्यात पाश्चात्य शिक्षण सुरु केले. या घटनेचा मोठा प्रभाव पडलेला आहे. ख्रिस्ती मिशनरी – धर्म कार्याबरोबर शालेय महाविद्यालयीन शिक्षण भारतात सुरु केले. मुलीच्या शाळा काढल्या. १८३२ अबोली इंग्रजी शाळा, ४१५ विद्यार्थी १८३५ – सेंट्रल कॉलेज (विल्सन कॉलेज) १८३६ अनाथ अपंग मुलींची शाळा काढली.

१८२४ – मुंबईत मुलींची शाळा – ४०० मुली ६५ शाळातून २७०० विद्यार्थी शिकू लागले.

१८१३ – चार्टर कायद्याने भारतात शिक्षण प्रसारासाठी एक लाख रूपये खर्च करण्याची तरतुद केली.


१८१७ – कलकत्ता–हिंदु कॉलेज, कलकत्ता स्कूल बुक सोसायटी, संस्कृत

F.Y.B.A. | इतिहास

भाग २

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

(१९०५ - १९४७)



डॉ. जी.बी. शहा
डॉ. बी.एन. पाटील

प्रशांत
पब्लिकेशन्स